


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७९९ वा मंगळवार दि. ११ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात चालतो केवळ मौखिक आदेशांचा खेळ...

## भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांची पद्धतशीर फिल्डिंग

**पोस्टमार्टम १००**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक व भांडारपाल यांच्या कार्यकाळात काही बेबंदपणे भ्रष्टाचार सुरू होता, तो राजरोस-पणे करता यावा, यासाठी जिल्हा रुग्णालयात लेखी आदेशांपेक्षा तोंडी आदेश जास्त देण्याचा प्रकार सुरू होते. भ्रष्टाचाराचा कोणताही पुरावा राहू नये म्हणूनच हा तोंडी आदेशाचा खेळ केला जात असल्याचे आता स्पष्ट झालेले आहे. पूर्वाश्रमीच्या जिल्हा शल्यचिकित्सकांकडूनही हा खेळ निवांतपणे खेळला जात होता. या प्रकारामुळे भ्रष्टाचार थांबण्याची कोणतीही प्रक्रिया जिल्हा रुग्णालयात कार्यान्वित होण्याची शक्यता नव्हती. असे सध्यातरी दिसून येत आहे. जिल्हा रुग्णालयात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराची विविध रूपे व विविध अंगे जनतेसमोर मांडण्याचे पत्रकारितेचे आद्य कर्तव्य दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून करीत आहे. जिल्हा रुग्णालयात जो काही भ्रष्टाचार बोकाळला आहे, तो भ्रष्टाचार बाहेर येऊन त्यात दोषींवर कारवाई का होत नाही, या विषयाचा जेंव्हा सखोल अभ्यास सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने करण्यात आला, तेंव्हा अनेक धक्कादायक बाबींचा खुलासा झालेला असून त्यात एक अधिकारी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांना निलंबित केले जिल्हा रुग्णालयात सध्याच्या घडीला लायकी आणि पात्रता दोन्ही नसताना वीजतंत्री एस. एल. अंभोरे हे वैद्यकीय विभागाचा कार्यभार पाहत आहेत. याच विभागात सध्या सगळ्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. मोठ्या प्रमाणात अवैध पद्धतीने बिले काढण्याचे काम या ठिकाणी होते आहे. या व्यवहारात जिल्हा रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी देखील सामील आहेत, हे सांगण्यासाठी आता कोण्या तज्ञ व्यक्तीची गरज उरलेली नाही. दरम्यानच्या काळात वैद्यकीय विभागाचा पदभार जेंव्हा कनिष्ठ लिपिक वाघ यांच्याकडे होता, त्या वेळी पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीसारखे वीजतंत्री अंभोरे हे तडफडत होते. अंभोरे यांनी सातत्याने वाघ यांच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रयत्न करूनही यश न मिळाल्याने मग अखेर अंभोरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांकडेच फिल्डिंग लावून हा पदभार मिळवला. मात्र, हा पदभार वीजतंत्री अंभोरे यांच्याकडे अधिकृतरित्या देता येत नसल्या कारणाने मग त्यातून जिल्हा शल्यचिकित्सकांनी एक पळवाट काढली. हा पदभार वाघ यांनी अंभोरे यांना द्यावा, यासंदर्भातील अधिकृत लेखी आदेश काढण्याऐवजी जिल्हा शल्यचिकित्सकांनी वाघ यांना पदभार सोडण्याचे तोंडी आदेश दिले. दरम्यान, दुसरीकडे अंभोरे हे वैद्यकीय विभागाचा पदभार घेण्यासाठी आदळआपट करीतच होते. आपल्या भ्रष्टाचारात आपले अधिकारीच सामील असल्या कारणाने आपल्याला हा पदभार मिळाल्याशिवाय राहणार नाही, याची खात्री अंभोरे यांना होतीच. शेवटी अंभोरे यांनी तिकडमबाज्या करून हा पदभार मिळवलाच. परंतु पदभार मिळण्यापूर्वी अंभोरे यांच्याकडून वाघ यांना प्रचंड मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न झाला. यासंदर्भात वाघ यांनी सातत्याने लेखी पत्र आपल्या वरिष्ठांना दिली. मात्र, वरिष्ठ अत्यंत बेजबादारपणे या प्रकरणाकडे बघ्याची भूमिका घेत राहिले. तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी या प्रकरणी आपल्या अंगावर कुठलेही शिंतोडे उडू नयेत, यासाठी वारंवार केवळ मौखिक आदेश यासंदर्भात दिलेले आहेत. वाघ यांना ओपीडी सेक्शन पाहण्याचे आदेश तोंडी देण्यात आलेले आहेत. अंभोरे यांच्याकडे वैद्यकीय विभागाचे कामकाजही तोंडी आदेशाद्वारे देण्यात आलेले आहेत. म्हणजे कागदावर एखाद्या विभागाचा पदभार एकाकडे, मात्र प्रत्यक्षात हा पदभार सांभाळणारा व्यक्ती भलताच, अशी स्थिती आहे. हा तोंडी आदेशाचा खेळ जिल्हा सामान्य रुग्णालयात राजरोस-पणे होताना दिसून येत आहे. खरे तर एखाद्या शासकीय कार्यालयात वरिष्ठांनी कनिष्ठ अधिकाऱ्यांना पदभार घेणे, पदभार सोडणे किंवा दुसऱ्या विभागात पाठवणे, यासंदर्भातील कार्यवाही ही लेखीच व्हायला पाहिजे. परंतु भ्रष्टाचार लपवण्यासाठी बुलढाण्याचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक हा प्रकार करीत




होते. आता भ्रष्टाचाराची सुरवात जर येथूनच होणार असेल मग तो भ्रष्टाचार शेवटी थांबवणार कोण? जिल्हा रुग्णालयातील हा भ्रष्टाचार थांबवण्याची इच्छा आणि धमक प्रशासनातील कोणत्याही अधिकाऱ्याकडे नसली, तरीही या भ्रष्टाचाराविरोधात सातत्याने आ-वाज उठवून हा भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र एकाकी लढत सातत्याने देत राहणार आहे. आम्हाला या लढ्यात कितीही संघर्ष करावा लागला आणि कितीही वेळ लागला, तरी आम्ही आमचा हा संघर्ष तोपर्यंत थांबवणार नाही, जोपर्यंत जिल्हा सामान्य रुग्णालयातील ही भ्रष्टाचाराची कीड पूर्णपणे नष्ट होत नाही. हाच आमचा निर्धार आहे आणि हाच आमचा संकल्प.

अजून बरेच काही पुढील भागात...

# खासदार प्रतापराव जाधव महत्वपूर्ण खात्याचे झाले मंत्री...

## देशातील जनतेच आरोग्य जपण्याला प्राथमिकता देऊ केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब- कल्याणमंत्री प्रतापराव जाधव

**जनसंचलन/बुलढाणा**

देशातील प्रत्येक नागरिकांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपण्याला आपण प्राथमिकता देणार असून गोरगरीब जनतेला आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात येणाऱ्या काळात काम करणार असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय आयुष आणि आरोग्य कुटुंब कल्याण स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे केंद्रीय मंत्र्यांचे खातेवाटप आज सायंकाळी झालं यामध्ये प्रतापराव जाधव यांच्याकडे आयुष्य मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार तर आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राज्य मंत्रालयाचा कारभार सोपवण्यात आला आहे त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे आयुष्य आणि आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालय जाहीर झाल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी अध्यात्मिक गुरु योगाचार्य श्री श्री श्री रविशंकर यांची सहकुटुंब जाऊन भेट घेतली आणि रविशंकरजी यांचे आशीर्वाद घेतले देशातील जनतेची आरोग्य सेवा करून लोकाभिमुख कार्य करा अशा सदिच्छा पर आशीर्वाद रविशंकरजी यांनी नामदार प्रतापराव जाधव यांना दिले यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी राजश्री जाधव जवाई सोहम वायाळ मुलगी नम्रता सोहम वायाळ मयुरी ताई ऋषिकेश जाधव त्यांचे स्वीय सहायक डॉ गोपाल डिके , राहुल सोळंकी यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की देशातील गोरगरीब



जनेला आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता राहणार आहे येणाऱ्या काळात देशातील आरोग्य सुविधा अधिक मजबूत करून सर्वसामान्य गोरगरीब जनतेला तिचा लाभ उत्तमरीत्या कसा मिळेल या दृष्टिकोनातूनही उपाययोजना करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितलं

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आरोग्य शिबिरात २५० रुग्णांची तपासणी...

## राजर्षी शाहू मल्टिस्टेट, वन बुलढाणा मिशन व गोदावरी फाऊंडेशनचा उपक्रम



जनसंचलन/संग्रामपूर

राजर्षी शाहू मल्टिस्टेट, वन बुलढाणा मिशन आणि गोदावरी फाऊंडेशनच्या (जळगाव खानदेश) संयुक्त विद्यमाने ८ जून रोजी संग्रामपूर येथे आयोजित मोफत आरोग्य शिबिरात २५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. पुढील उपचारांची गरज असणाऱ्या रुग्णांना १४ जून रोजी जळगाव खानदेश येथे बोलावण्यात आले आहे. वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीपदादा शेळके यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन झाले. यावेळी तहसीलदार उकर्डे,माजी पंचायत समिती सभापती पांडुरंग इंगळे, माजी नगरपंचायत अध्यक्ष हरिभाऊ राजनकर, श्यामभाऊ वायझोडे, वासुदेव वायझोडे , कलदार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात कर्करोग, बालरोग शस्त्रक्रिया, मेंदु-मणका फॅक्चर, हृदयरोग, नेत्रालय, गर्भपिशवी, नाक-कान-घसा शस्त्रक्रिया, अस्थिरोग, जनरल मेडीसीन, मानसोपचार यासह इतर आजारांवरील तपासणी व औषधोपचार करण्यात आले. संचालन माजी प्राचार्य रमेश राजनकर यांनी केले. आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी अडीचशेवर रुग्णांची तपासणी केली. पुढील उपचारासाठी त्यांना जळगाव खानदेशला पाठवण्यात येणार आहे. आवश्यकता भासल्यास त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राजर्षी शाहू परिवार कटिबद्ध आहे.

# गोशाला महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांसाठी निवेदन



जनसंचलन/बुलडाणा

गोशाला महासंघाच्या वतीने आज दि १० जून रोजी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले आहे. महाराष्ट्र मधील गोशाळा चा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन एप्रिल २०२३ मध्ये महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे गठन केले त्याचप्रमाणे गोसेवा आयोगा सोबतच गोशाळांना अनुदान करता १०० कोटी रुपये मंजूर केले त्यात ७० कोटी रुपये गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना २० कोटी रुपये गोमय मूल्यवर्धन योजना १० कोटी रुपये गोसेवा आयोग परंतु पशुसंवर्धन सचिव तुकाराम मुंढे यांनी गोसेवा आयोगाची नियमावली तयार न केल्यामुळे एक वर्ष होऊन सुद्धा आयोगाला कोणत्याही प्रकारचे अधिकार,मंजूर १०० कोटी रुपये अनुदान व आयोगाला कर्मचारी उपलब्ध होऊ शकले नाही शासन सकारात्मक असून सुद्धा प्रशासन नकारात्मक असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व गोशाळेचे खूप मोठे नुकसान झाले आहे त्यामुळे आज रोजी गोशाला महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे येऊन जिल्हाधिकारी यांना गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा निधी त्वरित वितरित करण्यात यावा, गोसेवा आयोगाला कर्मचारी व इतर त्यांचे अधिकार देण्यात यावे, गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही योजना गोसेवा आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात यावी, सर्व गोशाळा मधील गोवंशाला प्रति दिवस प्रति गोवंश १०० रुपये प्रमाणे चारा अनुदान त्वरित देण्यात यावे, संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी साठी ठोस उपाययोजना करण्यात याव्या,तर पशुसंवर्धन विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची त्वरित बदली करण्यात यावी आणि गायरान जमिनीवरील अतिक्रमण त्वरित काढण्यात यावे या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे

# एआरटी सेंटरला २० वर्षे पूर्ण...

## उत्कृष्ट कार्याबद्दल कर्मचाऱ्यांचा गौरव





जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा येथील एआरटी सेंटरला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. २० वर्षे अविरत सेवा दिल्याबद्दल केंद्रातील अधिकारी, कर्मचारी यांचा प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. भागवत भुसारी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद टाले, जिल्हा पर्यवेक्षक गजानन देशमुख, रणजीतसिंग राजपूत उपस्थित होते. केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. लता भोसले आणि कर्मचाऱ्यांनी स्मृतिचिन्ह स्विकारले. डॉ. भुसारी यांनी केंद्र आणि विहान प्रकल्पाच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. तसेच केंद्रातील औषधांचे सातत्य आणि नवीन एचआयव्ही संक्रमनाचे प्रमाण कमी झाले, अशी माहिती दिली. डॉ. लता भोसले यांनी मार्गदर्शन केले. विदर्भ रिजनल डाटा मॅनेजर विदर्भ रिजन लक्ष्मीकांत गोंदकर यांचा स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सतीश खरात, महेंद्रसिंग राजपूत, प्रदीप बंबाटकर, वैशाली इंगळे राजपूत, लता गवई, मिलिंद इंगोले, दीपक गवई, प्राची राजपूत, आकाश उमाळे यांना गौरविण्यात आले. तसेच २० वर्षांपासून केंद्रामध्ये औषधे घेत असलेल्या दांपत्याचा सत्कार करण्यात आला. विहानचे प्रोजेक्ट मॅनेजर गजानन जायभाये यांनी प्रास्ताविक केले. विहान प्रोजेक्ट कोऑर्डीनेटर मंगला उमाळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी वंदना चव्हाण, नीता जमाले, भीमसेन हिवराळे, आकाश हिवाळे यांनी पुढाकार घेतला.

# उधार दिलेले पैसे मागितले असता चाकूने हल्ला करून केले जखमी




जनसंचलन/बुलडाणा

बुलढाणा शहरातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. उधारी पैशाच्या वादातून एकाने २३ वर्षीय तरुणावर चाकू हल्ला केल्याची घटना चांडक ले आउट परिसरात घडली. याप्रकरणी समाधान रिंढे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्राप्त माहितीनुसार, शहरातील चांडक ले आउट परिसरातील रहिवासी ऋषिकेश निर्मळ याने आरोपी समाधानला दीड महिन्यांपूर्वी हजार रुपये दिले होते. दरम्यान, ९ जून रोजी दिलेले पैसे मागितले असता कोणते पैसे मी पैसे देणार नाही असे म्हणत समाधानने शिवीगाळ केली. तुला काय करायचे ते कर असे सांगून तो त्याच्या घरात निघून गेला. त्यानंतर चाकू घेऊन बाहेर आला व ऋषिकेश निर्मळ याच्या अंगावर धावून गेला. चाकूने वार करण्याचा प्रयत्न केला तेव्हा ऋषिकेशने तो वार आपल्या हाताने अडवला. यात ऋषिकेशच्या हातावर जखम झाली असून डाव्या तळहातावर व गळ्याच्या डाव्या बाजूवर चाकू लागला आहे. असे त्याने दिलेल्या तक्रारीत सांगितले. तक्रारी वरून पोलिसांनी समाधान रिंढे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास हवालदार रामकला सुरभे करत आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सिंदखेडराजा उपविभागातील पाझर तलावांची बनावट दुरुस्तीचे प्रकरण भोवणार

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत उपविभागात झालेल्या पाझर तलावाच्या दुरुस्ती संपूर्णतः बनावट कामांची चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्रदारांविरुद्ध कारवाईची मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. सदर प्रकरणात नुकतेच चौकशीचे आदेश प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी मृद व जलसंधारण नागपूर यांनी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी अमरावती यांना दिले आहे. प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी यांनी गांभीर्याने घेतलेल्या सदर प्रकरणात चौकशीअंती पाझर तलावांच्या बनावट दुरुस्तीचे प्रकरण चांगलेच भोवणार आहे. मृद व जलसंधारण उपविभाग मार्फत पाझर तलावांच्या दुरुस्ती बाबतचा संपूर्ण बनावट कामांची चौकशी ही दक्षता व गुण नियंत्रक पथका कडून व्हावी,यातील दोषी उपविभागीय अधिकारी मृद व जलसंधारण, व त्यांचे सहकारी शाखा अभियंतासह जबाबदार कंत्राटदार यांच्याविरुद्ध निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री आणि मृद व जलसंधारण मंत्री यांच्याकडे महाराष्ट्र राज्य युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना अंतर्गत फेब्रुवारी २०२२ मध्ये वरील दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देऊन त्या कामांचे मे २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर पाझर तलाव दुरुस्तीची कामे या उपविभागाकडून करण्यासाठी संबंधित एजन्सीला शाखा अभियंता व उपअभियंता यांनी संगणमत करून थातूरमातूर पद्धतीने व बोगस कामे करून घेऊन सदर कामे पूर्ण झाल्याचे दर्शविण्यात आले. तसेच बनावट देयके तयार करून अंदाजपत्रकाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत मापे नोंद करण्यात आल्याचा आरोप श्री खरात यांनी केला होता. सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करा व दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कंत्राटदार यांना कठोर शासन करून निलंबित करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने प्रचलित कायद्याप्रमाणे नाईलास्तव सक्षम प्राधीकरणाकडे,उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ अथवा लोकायुक्त मुंबई यांच्याकडे दाद मागावी लागेल अशा प्रकारचा निर्वाणीचा इशारा महाराष्ट्र राज्य सामाजिक युवा पुरस्कार प्राप्त युवा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी दिला होता.याची दखल घेत प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी यांनी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग यांना एका पत्राद्वारे नमूद प्रकल्प संबंधित माहिती तपासून खातरजमा व प्रमाणित करून तक्रारी मध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने आपले कार्यालयाचे अहवाल, व आपला सुस्पष्ट अभिप्राय तात्काळ सादर करण्याचे आदेश निर्गमित केले आहे.या आदेशानंतर प्रादेशिक जलसंधारण अधिकारी हे सदर प्रकरणास किती गांभीर्याने घेतात याबरोबरच त्यांच्या चौकशी संबंधी अहवालाकडे जनतेचे लक्ष लागले आहे.दरम्यान मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत पाझर तलावांची केलेली थातूरमातुर दुरुस्ती व बनावट देयके उपविभागीय मृत व जलसंधारण विभागास चांगलेच भोवणार आहे.

# रायपूर येथे महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

**जनसंचलन/चिखली**

**प्रतिनिधी:- (सचिन जयस्वाल)** रायपूर येथील शिवराणा मित्र मंडळ शिवजयंती उत्सव समिती आणि शिवसेना शांतिदूत नितीन राजपूत यांच्यावतीने महाराणा प्रताप जयंती अति आनंदाने काढण्यात आली सर्वप्रथम सकाळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला हार घालून सुरुवात करण्यात आली नंतर संध्याकाळी महाराणा प्रताप यांची भव्यदिव्य रॅली काढण्यात आली कार्यकर्ते अति उत्साहात होते यात ढोल ताशे गाडीवरती तोफ भजनी मंडळ ही प्रमुख आकर्षणे ठरली महाराणा प्रताप ची वेशभूषा प्रभाकर देशमाने यांनी व शिवाजी महाराजांची वेशभूषा शिवाजी भोसले यांनी घेतली होती मावळे सागर गाडे व प्रतीक शिरसाट यांनी घेतली कार्यकर्ते उमेश काळे कृष्ण जंजाळ सचिन देशमाने अंबादास भोसले अरुण भराड



राजेंद्र सिंग देशमुख मनोज पाटील गोपाल राजपूत अमोल राजपूत आकाश फोलाने भागवत शिरसाट विजय दांडगे ज्ञानेश्वर अवघडे रमेश अवघडे इत्यादी व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते रायपूर पोलीस स्टेशनच्या वतीने दुर्गेश राजपूत व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी चौक भूमिका बजावली

# सैनिक कार्यालयात माजी सैनिकांसाठी मानधनावर भरती

**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्हा सैनिक कार्यालयात माजी सैनिक प्रवर्गातून तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने तीन पदांवर नियुक्ती करण्यत येणार आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सभामंडप मॅनेजर हे १ पदा फक्त माजी सैनिक जेसीओ, सफाई कर्मचारी १ पद माजी सैनिक, सिव्हिलीयन, आणि चौकीदार हे १ पद माजी सैनिकांमधून भरण्यात येणार आहे. सदर पदांकरीता इच्छुक सैन्य दलातील सेवानिवृत्त झालेल्या व पात्रता पूर्ण करीत असलेल्या जिल्ह्यातील माजी सैनिकांनी दि. १४ जून २०२४ पर्यंत डिस्चार्ज बुक, पीपीओ, माजी सैनिक ओळखपत्र, एम्पलायमेंट कार्ड आणि वैयक्तिक अर्जासह जिल्हा सैनिक कार्यालयात अर्ज सादर करावेत सभामंडप व्यवस्थापकासाठी दहावी पास, वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत, महाराष्ट्र शासनाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र, मराठी व इंग्रजी टंकलेखनाचा वेग दर मिनीटास किमान ४० शब्द असावा. यासाठी २४ हजार ७९ रूपये मानधन देण्यात येणार आहे. सैन्य दलातील चारित्र्य कमीत कमी गुड, मेडीकल कॅटेगरी ही शेप-१ असावी लागणार आहे. सफाई कर्मचारी हा दहावीपर्यंत शिक्षित आणि वयोमर्यादा ५० वर्षापर्यंत असावी. यासाठी १२ हजार ९० रूपये मानधन देण्यता येणार आहे. सैन्य दलातील चारित्र्य कमीत कमी गुड, मेडीकल कॅटेगरी ही शेप-१ असावी लागणार आहे. चौकीदार पदासाठी दहावीपर्यंत शिक्षण आणि वयोमर्यादा ५० वर्षापर्यंत असावी लागणार आहे. तसेच १९ हजार ९९२ रूपये मानधन देण्यात येणार आहे.

इच्छुकांनी यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# अफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये बुलडाण्याचा झेंडा

## जिल्ह्याच्या पाच सुपुत्रांनी वेळेत पूर्ण केली जगातील खडतर स्पर्धा

**जनसंचलन/बुलढाणा**

दक्षिण अफ्रिकेत ९ जून रोजी झालेल्या ८५.९१ किमी कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये बुलडाण्याचा झेंडा फडकला आहे. जिल्ह्याच्या पाच सुपुत्रांनी जगातील अतिशय खडतर अशी ही स्पर्धा वेळेत पूर्ण केली. उपजिल्हाधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे, डॉ. विजय वाघ, संतोष जाधव, प्रशांत राऊत आणि महेश महाजन अशी या यशवंत खेळाडूंची नावे आहेत. कॉम्रेड मॅरेथॉन ही जगातील नामांकित आणि खडतर स्पर्धा आहे. ही स्पर्धा पूर्ण करतांना खेळाडूंचा कस लागतो. स्पर्धेत सहभागी होऊन वेळेत स्पर्धा पूर्ण करणे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. त्याकरिता खेळाडू कठोर मेहनत घेतात. यावर्षी ९ जून रोजी ही मॅरेथॉन स्पर्धा झाली. डर्बन येथून सुरू झालेली मॅरेथॉन पीटरमेरीटबर्ग शहरात संपली. यावर्षीचा अप रन होता. एक वर्षी डाउन रन आणि एक वर्षी अप रन असतो. यावर्षीचे अंतर ८५.९१ किमी होते. ७४ हुन अधिक देशातील २२००० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये ३६६ भारतीय स्पर्धक होते. सदर स्पर्धा १२ तासांच्या आत पूर्ण करावी लागते. त्यासाठी गेली सहा महिने जिल्ह्यातील सर्व स्पर्धकांनी अतिशय कठोर मेहनत घेतली. आपल्या यशाचे श्रेय ते कुटुंबीय आणि रनिंगसाठी मदत करणाऱ्या सर्व मित्रांना देतात. बुलडाणा येथील संतोष जाधव यांनी रेकॉर्ड टायमिंगमध्ये ही स्पर्धा पूर्ण केली. भारतीय स्पर्धकांमध्ये टॉप टेनमध्ये राहत सातव्या क्रमांकावर आले. त्यांनी ८:४७:३० तासांत ही स्पर्धा पूर्ण केली. मूळचे नांद्राकोळी येथील आणि सध्या छत्रपती संभाजीनगर येथे स्थायिक असलेले प्रशांत राऊत यांनी ही स्पर्धा ११:२२:४२ तासांत पूर्ण केली. बुलडाणा येथील अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय वाघ यांनी ही स्पर्धा ११३३२८:: तासांत पूर्ण केली. तर चिखली येथील महेश महाजन




यांनी ११५३४८:: तासांत स्पर्धा पूर्ण केली. देऊळगाव माळी गावचे सुपुत्र उपजिल्हाधिकारी ललितकुमार वऱ्हाडे यांनी १०:४१:२५ तासांत ही स्पर्धा पूर्ण केली. सलग दुसऱ्या वर्षी त्यांनी हे यश मिळवले. गतवर्षीपेक्षा कमी वेळेत स्पर्धा पूर्ण करीत त्यांनी आपल्या कामगिरीत सुधारणा केली. उपजिल्हाधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे यांची स्पोर्ट पर्सन म्हणून ओळख आहे. अत्यंत व्यस्त शेड्युलमध्ये सुद्धा त्यांनी आपल्यातील खेळाडू जिवंत ठेवला आहे. रनिंगशिवाय क्रिकेट,खो-खो, व्हॉलीबाल, सायकलिंगची त्यांना विशेष आवड आहे. सध्या ते नांदेड येथे उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

# बारामतीत पुन्हा काकांचा बोलबाला अजित पवारांना शह देण्यासाठी शरद पवार पुन्हा रिंगणात...

**वृत्तसंस्था/बारामती**

पक्षफुटीनंतर झालेल्या लोकसभा निवडणूकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला अवघी एक जागा मिळाली. आता विधानसभा तोंडावर असताना शरद पवार यांनी बारामतीत बारकाईने लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी ते बारामतीत व्यापारी आणि वकील वर्गाचा मेळावा घेणार असून दुष्काळी दौराही करणार आहेत. त्यामुळे बारामतीवरील अजित पवार यांच्या वर्चस्वासाठी हे घातक ठरू शकते. जिल्ह्यासह बारामती तालुक्यात सर्व संस्थांवर अजित पवार यांची पकड आहे. या संस्थांचे पदाधिकारी, संचालक यांची मोठी ताकद त्यांच्याकडे आहे. परंतु तरीही लोकसभा निवडणूकीत बारामती तालुक्याने त्यांना अपेक्षित साथ दिली नाहीच उलट सुळे यांना येथून एक लाखांहून अधिक मताधिक्य देत अजित पवार यांना जोरदार धक्का दिला. सगळी ताकद, रसद असताना आणि भाजप, सेना, मित्रपक्षांची ताकद मागे असतानाही सुनेत्रा पवार बारामतीत मागे पडल्या.बारामतीत मतांची बरोबरी राहिली असती तरी अजित पवार यांना आहेसे वाटले असते, परंतु तसे घडले नाही. बारामतीकरांनी त्यांना जोरदार झटका दिला. अजित पवार यांनी शरद पवार यांची साथ सोडणे आणि भाजपबरोबर जाणे हे मतदारांना रुचले नसल्याचे कारण यामागे असल्याचे बोलले जात आहे. विधानसभेलाही दादांना बारामतीत जखडून ठेवण्याची जोरदार तयारी शरद पवार गटाकडून सुरु आहे. त्यातच शरद पवार आता लोकसभेनंतर लागलीच बारामतीच्या दौऱ्यावर येत आहेत.पक्षफूटीपूर्वी राज्य आणि केंद्रस्तरावरील कामातच शरद पवार लक्ष घालत होते. पण आता परिस्थिती बदलली आहे. त्यामुळे बारामतीत विविध मेळावे यापुढील काळात घेत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी शरद पवार प्रयत्नशील आहेत. बारामतीचा ग्रामीण भाग हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे लवकरच दुष्काळी दौऱ्याच्या निमित्ताने ते त्यांच्याशी संवाद



साधतील. शरद पवार यांचा एक दौराही अजित पवार गटासाठी मोठा धोका निर्माण करू शकतो. लोकसभा निकालानंतर अजित पवार अद्याप बारामतीत आलेले नाहीत. शरद पवार यांनी मात्र तात्काळ काम सुरु केले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना उभारी मिळणार असून पक्ष संघटन वाढेल असे जाणकरांकडून बोलले जात आहे.

## विधानसभा तोंडावर, नाराजांची संख्या वाढली, एकनाथ शिंदे यांनी शोधला उपाय, अजितदादांसमोरच विस्ताराचे संकेत

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीत महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळवता आला आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुतीच्या आमदारांमध्ये असलेला उत्साह आता निकालाअंती ओसरलेला पाहायला मिळतो. यातच काही शिंदे गट आणि अजित दादा गटाचे काही आमदार युतीतून बाहेर पडण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी विधानसभा निवडणुकीतील संभाव्य फटका टाळण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जालीम उपाय शोधला आहे.लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरणार असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली होती. यातच मुख्यमंत्र्यांनी देखील लवकरच मंत्रिमंडळ विस्ताराच्या बातमीला दुजोरा दिला आहे. विशेषतः काही नवीन चेहऱ्यांना यामध्ये संधी देण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मुंबई कोस्टल रोड प्रकल्पातील दुसऱ्या बोगद्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख उपस्थिती लावली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ विस्ताराबाबत उपमुख्यमंत्री अजित पवारांसमोरच सूचक वक्तव्य केले आहेमुख्यमंत्री म्हणाले, रस्त्यांचा विस्तार होतच आहे त्याप्रमाणेच मंत्रिमंडळाचा विस्तार देखील लवकरच होणार आहे. महायुतीतील अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या समावेशामुळे मंत्रिमंडळ विस्तार रखडला आहे.



दरम्यान मंत्रीपदासाठी शिवसेनेतील आमदारांसोबतच राष्ट्रवादीचे आमदार देखील इच्छुकांच्या रांगेत आहेत.भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदेंच्या सेनेच्या कोणत्या आमदारांना मंत्रीपद मिळणार हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. ज्या आमदारांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार नाही त्यांची महामंडळावर नियुक्ती करून नाराजी दूर करण्याचा या निमित्ताने प्रयत्न केला जाणार असल्याचं समजतंय.

## देऊळगावराजा येथे छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करीयर शिबीराचे आयोजन

**जनसंचलन/ बुलडाणा**

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबईच्या वतीने देऊळगाव राजा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवार, दि. १९ जून २०२४ रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करीयर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उप विभागीय अधिकारी संजय खडसे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व्ही. बी. बचाटे, मुख्याधिकारी श्री. मोकळ, उद्योजक श्री. मनियार आदी उपस्थित राहणार आहेत. आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी व्ही. बी. बचाटे अध्यक्षस्थानी राहतील. शिबिरात तज्ज्ञ व्यक्तींचे करिअरसंबंधी मार्गदर्शन लाभणार आहेत. शिबिरामध्ये दहावी, बारावीनंतरचे शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, मुलाखत तयारी, नवीन तंत्रज्ञान आधारीत रोजगाराच्या संधी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना आणि कर्जयोजनेबाबत माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे यावेळी दहावी, बारावी. डिप्लोमा, डिग्री उत्तीर्ण, अनुत्तीर्ण, सर्व विद्यार्थी व पालकांनी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. भावले यांनी केले आहे.

## न्यू मारूती सुझूकी स्विप्ट डिझायर कारचे लॉचिंग सोहळा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन परिवाराच्या हस्ते संपन्न

### वाहनप्रेमींना सुर्वण संधी आजचं मारूती सुझुकी ग्रामीण महोत्सवला भेट देउन आपली आवडती कार बुक करा...

**जनसंचलन/बुलढाणा**

मानराज मोटर्स बुलडाणा यांच्याकडून आज दिनांक ०९/०६/२०२४ ला शहरातील गांधी भवन येथे या स्पर्धेच्या युगात सुझुकी मारोती या नामांकित कंपनीने चाहत्यांच्या सोयीनुसार मारोती सुझुकी स्विफ्ट या चारचाकी वाहनाचा अनावरण (Launching)बुलडाणा येथील उद्योजक तथा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन मुख्य संपादक जितेंद्र कायस्थ व उपसंपादक अजय राजगुरे तसेच मानराज मोटर्सचे मॅनेजर राम हरणे सह शहरातील मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले आहे.या ग्रामीण महोत्सवला ग्रामीण भागातील नागरिकांसह शहरातील नागरिकांनी मोठया संख्याने उपस्थितीत झाले आहे. नवीन लॉंच झालेले नवीन कार म्हणजे आजच्या युगातील स्पर्धेतील उत्कृष्ठ कार आहे असे म्हणावे लागेल कारण या कार मध्ये मिळणाऱ्या सुविधा अतिशय चांगल्या आहे. कार मध्ये ६ एयर बॅग आहे ज्या की इतर कारच्या तुलनेत अतिशय योग्य आहे. तसेच ज सिरीज इंजीन आहे.तसेच ॲव्हरेंजच्या बाबतीत तर भारीच आहे. २५ केएमपीएल असे आहे.२५ ॲव्हरेंज हि गाडी देत आहे. या कारची डिझाइन भारीच आहे. न्यू ग्रिल तसेच न्यू ॲडव्हान्स सरपेंशन या कार मध्ये आहे.परिवारासाठी अतिशय लाबदाय हि कार आहे.त्यामुळे वेळ न घमविता लवकरात लवकर गांधी भवन येथे किंवा मानराज मोर्टस खामगाव रोड वर असलेल्या शोरूमला भेट देउन आपली आवडती कार बुक करा

